फक्त सभासदांसाठी
वर्ष ४४वे, अंक ७वा ❊ जानेवारी २०२६

सभा : मंगळवारी संध्या. ६.३० वा.
रूईया मूक बधिर शाळेचे सभागृह,
स.प.महाविद्यालय प्रांगण (मागची बाजू)

# स्नेह सेवा

## मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी, पुणे

❊ अध्यक्ष ❊
डॉ.राधा संगमनेरकर
मो. ९८८१३०७२७८

नोंदणी क्र. MAH /1528/06/Pune, दिनांक ७ सप्टेंबर २००६
पत्रव्यवहारासाठी पत्ता :
द्वारा-प्रबोध, १०७०, शुक्रवार पेठ, सुभाषनगर लेन नं. ६, पुणे ४११००२.
snehseva1981@gmail.com

❊ संपादक ❊
प्रा. रवींद्र कोठावदे
मो.९८६०४२४३४९

### सरणारे वर्ष मी



मी उद्या असणार नाही,
असेल कोणी दुसरे!
मित्रहो, सदैव राहो,
चेहरे तुमचे हासरे.......!

झाले असेल चांगले,
किंवा काही वाईटही!
मी माझे काम केले,
नेहमीच असतो राईट मी!

माना अथवा नका मानु,
तुमची माझी नाळ आहे!
भले होवो, बुरे होवो,
मी फक्त 'काळ' आहे.......!

उपकारही नका मानु,
आणि दोषही देऊ नका......!
निरोप माझा घेतांना,
गेटपर्यंतही येऊ नका!

उगवत्याला 'नमस्कार',
हीच रीत येथली!
विसरु नका एक वर्ष,
साथ होती आपली!

धुंद असेल जग उद्या,
नव वर्षाच्या स्वागताला!
तुम्ही मला खुशाल विसरा,
दोष माझा प्राक्तनाला!

शिव्या, शाप, लोभ, माया,
यातले नको काही.......!
मी माझे काम केले,
बाकी दुसरे काही नाही!

निघताना 'पुन्हा भेटु',
असे मी म्हणणार नाही!
'वचन' हे कसे देऊ,
जे मी पाळणार नाही.......!

मी कोण? सांगतो
'शुभ आशीष' देऊ द्या,
'सरणारे वर्ष', मी,
आता मला जाऊ द्या.......!

**कवी : मंगेश पाडगावकर**

### अनुभव कथन

आपल्या स्नेहसेवामध्ये, मंगळवार, दि. ६ जानेवारी, २०२६ रोजी श्री. प्रसाद गोडबोले आणि सौ. शुभदा गोडबोले यांनी अनुभव कथन केले आणि या वर्षाची सुरुवात चांगली झाली.

श्री. गोडबोले व्यवसायाने मरीन इंजिनिअर आहेत. ३६ वर्षे त्यांनी मर्चंट नेव्हीमध्ये मरीन इंजिनिअर म्हणून काम केले. अनेक वर्ष त्यांनी समुद्रात महाकाय बोटींवर व्यतीत केली आहेत. सौ. गोडबोले यांनी सुद्धा अनेक समुद्र सफरी केल्या. त्या दोघांनी आपल्याला थोडयाशा अपरिचित अशा जल आणि वायू विश्वातील त्यांच्या सफरीमधील थरारक आणि रोमांचकारी अशा अनुभवांचे कथन केले. या समुद्री विश्वातील संकटे म्हणजे वादळे, चाच्यांचे हल्ले इ.अनुभव, तसेच

मुलगी पायलट असल्याने तिचे कॉकपीटमधील अनुभव या सर्वांवर आधारित 'अकस्मात होणार होऊनी जाते ' या नावाचे पुस्तकही लिहिले आहे.

या कार्यकमाची सुरुवात ही आगळी वेगळी म्हणजे सौ. गोडबोले यांनी शंख-नाद करुन केली.

असाच एक थरारक अनुभव श्री. गोडबोले यांनी सांगितला. दि. १२ डिसेंबर, १९८८ रोजी त्यांची बोट कॅनडाहून मुंबईला निघाली होती. शांत दिवस होता, पण अचानक स्फ़ोटाचा प्रचंड आवाज आला. त्याचा शोध घेताना लक्षात आले की वरच्या रेडिओरुम च्या स्टीलच्या भिंतीला मोठे भगदाड पडले आहे. रेडिओ रुमची खूप नासधूस झाली आहे आणि वाईट गोष्ट म्हणजे त्यांचे अतिशय निकटचे सहकारी अतिशय गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर त्वरित वैद्यकीय उपचार सुरु केले. इतर जहाजांना मदतीसाठी हाक दिली. शेवटी एका अमेरिकन हेलिकॉप्टरने त्यांना रुग्णालयात दाखल केले. पण काही उपयोग न होता त्यांची प्राणज्योत मालवली. सर्वांना एक तरुण, नेक सहकारी गमावल्याचा धक्का बसला. इतकी वर्षं झाली तरी तो दुःखद प्रसंग ते अजूनही विसरु शकले नाहीत. हा प्रसंग ऐकून सर्व श्रोतेही अगदी सुन्न झाले.

शेवटी हा अपघात कसा झाला याचाही शोध लागला. अमेरिकन नौसेना दलाचा सराव चालू असल्याची माहिती नजरचुकीने आधी ह्यांना कल्पना दिली गेली नाही. त्यामुळे हा दुर्दैवी प्रसंग ओढवला होता.

दुसरा अनुभव त्यांच्या पत्नी, शुभदा गोडबोले यांनी कथन केला. तो त्यांची कन्या पायलट झाली आणि मेलबर्नला तिला पायलट लाईसेन्स मिळाले. तेव्हा तिच्याबरोबर तिच्या पहिल्या उड्डाणात सहभागी होण्याची अनमोल संधी मिळाली त्याचे. त्यात मुंबई ते मेलबर्न प्रवास. पुढे तिथे ते छोटेसे विमान पाहून झालेला अपेक्षा भंग. प्रत्यक्ष उड्डाणात झालेली धडधड, भीती. पण नंतर मात्र मुलीबद्दल वाटणारा अभिमान, कौतुक....... सारं काही.

हे सर्व त्यांनी साभिनय करुन दाखवून वातावरण अगदी हलके फुलके केले. त्यांनी काही कविता, गाणी सुद्धा सादर केलीत. दोघांनी केलेले हे अनुभवाधारित सादरीकरण सर्वांना खूपच भावले.

या कार्यक्रमात वक्त्यांची ओळख श्री. अविनाश गोहाड यांनी करुन दिली आणि प्रा. रवींद्र कोठावदे यांनी आभार प्रदर्शन केले.

**सौ. सुनीता फुलंब्रीकर**

## ज्येष्ठांसाठी दातांची काळजी

मंगळवार, दि. १३ जानेवारी, २०२६ रोजी स्नेहसेवात डॉ. प्रशांत भंगाळे हे दंतवैद्यक 'ज्येष्ठांसाठी दातांची काळजी' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान देण्यासाठी आले होते.

डॉ. प्रशांत यांनी मानवाच्या जबड्याची व दातांची रचना कशी असते, हे सांगितले. खूप वर्षांपूर्वी जेव्हा अनेक पदार्थ कच्चे चावून खात, तेव्हा त्या वेळी ही रचना वेगळी होती आणि आत्ता आपण जे अन्न खातो त्यानुसार जबडा आणि दाताच्या रचनेत खूप बदल झालेले आहेत.

सर्वसाधारणपणे साठ वर्षांनंतर दात पडतात आणि नंतर कवळी बसवतात असा काहीसा समज ज्येष्ठ नागरिकांमध्ये असतो. परंतु आता दंतवैद्यक शास्त्र खूप प्रगत झाले आहे. या नवीन बदलांची माहिती घेऊन त्याचा लाभ आपल्या लोकांनाही मिळावा, यासाठी डॉ. प्रशांत परदेशात जाऊन हे नवीन शास्त्र आत्मसात करतात. या नवीन बदलांची माहिती डॉ. प्रशांत यांनी श्रोत्यांना दिली.

दात, हिरड्या यांची निगा राखणे किती आवश्यक आहे आणि त्यासाठी त्याची काळजी कशी घ्यावी, हे डॉ.प्रशांत यांनी सांगितले. दात ब्रश कधी, कसे करावेत,

टूथब्रशने दातावर किती प्रेशर द्यावे, ब्रश कसा निवडावा, तो किती दिवस वापरावा, हिरड्यांचे आरोग्य कसे जपावे, याची चांगल्या पद्धतीने सविस्तर माहिती डॉक्टरांनी दिली.

तोंडाची काळजी न घेतल्यास त्याचे काय काय दुष्परिणाम होतात, याबद्दल त्यांनी माहिती दिली. हे टाळण्यासाठी ठराविक कालांतराने दंतवैद्याकडे जाऊन दातांची तपासणी करुन त्यांचा सल्ला घ्यावा, असे सुचविले.

दाताला काही इजा झाल्यास, शक्यतो आहेत ते दात वाचवण्याचा प्रयत्न डॉक्टर करतात. आता प्रगत झालेल्या शास्त्रामुळे खूप खराब झालेला दात काढून त्याजागी लगेच कृत्रिम दात बसवता येतो आणि नैसर्गिक दाताप्रमाणे हा कृत्रिम दात दोन चार दिवसात कोणतेही पदार्थ चांगल्या तऱ्हेने चावून खाऊ शकतो. प्रगत तंत्रज्ञानाने अगदी ८०-८५ व्या वर्षीही कृत्रिम दात बसवता येतात.

डॉ. प्रशांत यांचे या विषयातील सखोल ज्ञान, २५-२६ वर्षांचा अनुभव, प्रगत शास्त्राची माहिती करुन घेऊन त्याचा वापर, आणि बोलताना अचूक तऱ्हेने केलेली शब्दांची, वाक्यांची मांडणी, यामुळे त्यांनी थोडा रुक्ष वाटणारा विषय अतिशय इंटरेस्टिंग करून सर्वांना मार्गदर्शन केले.

अनेक सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना डॉ. प्रशांत यांनी समाधानकारक आणि समर्पक उत्तरे दिली व तोंडाचे आरोग्य चांगले रहावे, यासाठी लहान लहान टिप्स दिल्या.

साधारण ४५ मिनिटे डॉ. प्रशांत यांनी आपल्या माहिती

सांगण्याच्या शैलीने सभासदांना खिळवून ठेवले होते.

श्री. अविनाश गोहाड यांनी त्यांचा परिचय करुन दिला.

प्रा. रवींद्र कोठावदे यांनी आपल्या खुसखुशीत शैलीत व्याख्यानाचा आढावा घेऊन डॉ. प्रशांत यांचे आभार मानले. त्याचे सर्वांनी कौतुक केले.

नेहमीप्रमाणे छानसा अल्पोपहार झाल्यावर हा कार्यक्रम संपन्न झाला.

**अविनाश गोहाड**

## हेरिटेज वॉक

मंगळवार, २० जानेवारी, २०२६ रोजी आपल्या स्नेहसेवा संस्थेत प्रा. डॉ. गणेश राऊत यांचे 'हेरिटेज वॉक' या विषयावर व्याख्यान झाले.

प्रा. डॉ. राऊत यांनी पुण्याजवळ साधारण २५० वारसा स्थळे आहेत आणि तेथे सर्वांनी आवर्जून भेट द्यावी असे सुचवले. त्यातील काही वारसा स्थळांचे डॉ. राऊत सरांनी थोडक्यात वर्णन करुन

ह्या वास्तूंचे ऐतिहासिक महत्त्व विषद केले.

१) छत्रपति शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा....हा पुतळा आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिल्पकार, श्री. करमरकर यांनी कसा घडवला आणि तो पुण्यात रेल्वेने कसा आणला याचे वर्णन केले.

२) शनिवार वाडा... हा वाडा तीन ते चार मजली असावा. याचे तोंड उत्तरेकडे का आहे, यामागचे कारण सांगितले. अब्दालीबरोबर जी लढाई झाली, त्याच्या खुणा शनिवार वाड्यात मिळतात.

गोव्याच्या लढ्यासाठी शनिवारवाड्यासमोर सुमारे तीन लाख लोकांची विराट सभा भरलेली होती.

३) भारत इतिहास संशोधन मंडळ....

ही वास्तू इतिहासाने समृद्ध आहे. गोव्याची मालकी सिद्ध करताना येथील इतिहासकार ग. ह. खरे , काशिनाथ राजवाडे यांच्या कागदपत्रांचा पुरावा ग्राह्य धरला गेला.

वेळ कमी असल्याने काही वास्तूंचे वर्णन डॉ. राऊत यांनी एकेका वाक्यात केले. या सर्व वास्तूंचा इतिहास सांगताना त्यांनी काही मजेदार किस्सेही ऐकवले.

४) आघारकर इन्स्टिट्यूट.... हे पुण्याचे वैभव आहे.

५) भांडारकर इन्स्टिट्यूट... एकच विषय घेऊन भांडारकर यांनी साठ वर्षे महाभारतावर संशोधन केले. त्यासाठी २,५०० वेगवेगळे ग्रंथ अभ्यासले.

जैन ग्रंथातील सुबक चित्रे या इन्स्टिट्यूटमधे पहायला मिळतात.

६) महाराष्ट्र साहित्य परिषद.... येथे अनेक जुनी दुर्मिळ पुस्तके आहेत.

७) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ... ही छान वैभवशाली दगडी इमारत आहे. चापेकरांनी भारतीयांना छळणाऱ्या ब्रिटिश अधिकारी ग्रँडचा वध येथील जवळच्या भागातच केला होता.

८) पुणे नगर वाचन मंदिर... लोकहितवादी रानडे यांच्या पुढाकारातून हे वाचनालय उभे राहिले. भरपूर वाचनीय ग्रंथ, पुस्तके येथे आहेत.

९) राजा दिनकर केळकर संग्रहालय... या संग्रहालयासाठी विविध वैशिष्टयपूर्ण वस्तू मिळविण्यासाठी केळकर यांनी आयुष्य वेचले.

१०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय... बाबासाहेबांच्या वापरातील अनेक वस्तू येथे पाहायला मिळतात. त्यांना मिळालेले भारतरत्न येथे ठेवले आहे. बाबासाहेबांच्या भाषणाच्या रेकॉर्डस् येथे ऐकायला मिळतात.

११) विधान भवन... मुळशी धरण जागेतील विस्थापितांचे पुनर्वसन व्हावे यासाठी केशवराव जेधे यांनी शेतकऱ्यांचा प्रचंड मोर्चा काढून या ठिकाणी सत्याग्रह केला होता.

१२) नाना वाडा... भले बुद्धीचे सागर नाना ....या दगडी वाड्यात अनेक मसलती होत. नानांचे गुप्त हेर खाते फारच मजबूत होते. येथे ५००० चौ.फू. एवढे मोठे प्रेक्षणीय लाकडाचे फॉल्स सिलिंग आहे.

१३) विश्रामबाग वाडा... वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना.

कलाकृतींचे संग्रहालय आहे. वेळेचे भान ठेवत आणि मिश्किल टिपणी करत प्रा. डॉ. राऊत अजून काही वास्तूंबद्दल माहिती थोडक्यात सांगत होते.

१४) महात्मा फुले वाडा... 'गुलामगिरी' हा ग्रंथ महात्मा फुले यांनी या ठिकाणी लिहिला.

१५) सिंहगड किल्ला... याच्या तटबंदीचे बांधकाम भक्कम आहे.

१६) मामलेदार कचेरी..क्रांतिकारक उमाजी नाईक आणि मामलेदार कचेरी यांचे नाते प्रा. डॉ. राऊत यांनी सांगितले.

१७) लाल महाल... हे नाव घेतले की शाहिस्तेखानाची फजिती आठवते.

१८) पाताळेश्वर लेणी...भर वस्तीत असलेल्या या लेण्यांमध्ये अनेक शिल्पे पाहायला मिळतात.

१९) कसबा गणपती...

जुने देऊळ आहे आणि हे पुण्याचे ग्रामदैवत आहे.

२०) नागेश्वर मंदिर....

सोमवार पेठ येथील ही वास्तू देखणी आहे. यामध्ये प्रसिद्ध चित्रकार रेगे यांची चित्रे बघायला मिळतात.

२१) ओंकारेश्वर मंदिर... ही क्रांतिकारकांची लपण्याची

जागा होती.

२२) पर्वती टेकडी आणि मंदिर... येथील संग्रहालय अप्रतिम आहे. या टेकडीवरुन बाजीराव पेशवे यांनी येरवडा येथे चाललेल्या लढाईचे दुर्बिणीतून निरीक्षण केले होते.

२३) त्रिशुंड गणपती मंदिर... अप्रतिम कलाकुसर असलेले भर वस्तीतील मंदिर.

२४) महादजी शिंदे छत्री.... महादजी शिंदे यांनी येथे शेवटचा श्वास घेतला. येथील बांधकाम प्रेक्षणीय आहे. प्रा. डॉ. राऊत यांनी शिंदे घराण्याचा इतिहास थोडक्यात सांगितला.

दिलेल्या वेळेत प्रा. डॉ. राऊत यांनी अनेक वास्तूंचे ऐतिहासिक महत्त्व अतिशय ओघवत्या भाषेत सांगितले.

या स्थळांचा इतिहास रंजकतेने आणि प्रसंगानुसार विनोद सांगून प्रा. डॉ. राऊत यांनी त्यांचे अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले.

अशा वारसा स्थळांना प्रत्यक्ष भेट देऊन येथील सविस्तर माहिती घेण्यासाठी सर्वांना प्रेरणा दिली.

सौ. सुनीता फुलंब्रीकर यांनी डॉ. गणेश राऊत यांचा परिचय करुन दिला. प्रा. रवींद्र कोठावदे यांनी त्यांच्या व्याख्यानाचा मागोवा घेऊन आभार मानले.

**अविनाश गोहाड**

## चापेकर वाडा भेट

दि. २७ जानेवारी, २०२६ रोजी स्नेहसेवाच्या सदस्यांनी चिंचवडला भेट दिली. या भेटीमध्ये सर्वांनी श्री मोरया गोसावी गणपती मंदिर, मंगलमूर्ती वाडा, चापेकर वाडा आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे थेरगाव बोटक्लब इ. प्रसिद्ध स्थळांना भेट दिली.

प्रथम श्री मोरया गोसावी गणपती मंदिरात जाऊन सर्वांनी दर्शन घेतले. सर्व गणेश भक्तांचे हे महत्त्वाचे श्रद्धा स्थान आहे. पवना नदीकाठी बांधलेले हे प्राचीन मंदिर फारच सुंदर आहे. श्री. मोरया गोसावी यांचा जन्म, त्यांचे कार्य, त्यांची गणेश भक्ती यांबद्दल मंदिरात सर्वत्र माहिती आणि चित्रांचे फलक लावलेले आहेत. येथे त्यांची संजीवन समाधी आहे, त्यावर आता गणेश मंदिर उभारले आहे.

नंतरची भेट चिंचवड देवस्थान ट्रस्टच्या मंगल मूर्ती वाड्याला होती. येथे सुद्धा मोरया गोसावी यांच्या जीवनावर आधारित तैलचित्रे व माहितीचे एक दालनच आहे.

यानंतर क्रांतितीर्थ ह्या क्रांतिवीर चापेकर वाड्याला भेट दिली. चापेकर बंधू म्हटलं की आठवते २२ जून, १८९७ ही तारीख आणि गोंद्या आला रे आला ही ऐतिहासिक आरोळी. हे तीन चापेकर बंधू म्हणजे दामोदर हरी, बाळकृष्ण हरी आणि वासुदेव हरी. या तीन बंधूंनी इंग्रज अधिकारी रँड याच्या अत्याचाराला कंटाळून त्याची हत्या केली. त्याबद्दल इंग्रज सरकारने तिघांनाही पकडून त्यांना फाशी दिली. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात या बंधुंचे नाव अजरामर झाले आहे. त्यांच्या वास्तव्याने पुनीत झालेला वाडा पाहायचा म्हणून सर्वजण भारावून गेले. या वाड्याला आता पूर्णपणे नवीन रुप दिले आहे. त्या काळातील जीवन शैली दाखविण्यासाठी तेथे प्रसंगनुरुप पुतळे उभारले आहेत. आत प्रवेश केल्यावर, तळमजल्यावर, अंगणात तुळशीला पाणी घालणारी स्त्री, गाय, वासरू, ओसरीवर आजारी लोकांना औषधं देणारे त्यांचे वैद्य आजोबा दिसतात. या मुलांना वाद्य शिकवणारे वडील, स्वयंपाक घर - अगदी त्यातील पितळ्याची भांडी, धान्य कोठी, देवघर, माजघर, या कुटुंबाच्या सांत्वनाला आलेल्या भगिनी निवेदिता इ. प्रसंग बारकाव्यानिशी हुबेहूब साकारले आहेत. दुसऱ्या मजल्यावर दामोदरपंत व लोकमान्य टिळक यांची भेट दाखवली आहे. या बंधूंच्या छापखान्यात आलेले क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके, फितुरी करून इंग्रजांना चापेकर बंधूंची माहिती देणाऱ्या द्रविड बंधूंची हत्या, इ. प्रसंगांचे सुरेख पुतळे आहेत. सर्वांत वरच्या मजल्यावर रँड वधाचा प्रसंग. ते बग्गीतून जात असताना त्यांच्यावर पाळत ठेवून इशारा मिळाल्यावर दामोदर पंतांनी बग्गीवर चढून रँडवर झाडलेल्या गोळया. हा सर्व प्रसंग दृक-श्राव्य पद्धतीने दाखविला आहे आणि ते पाहून सर्वांचे मन देशभक्तीने उचम्बळून आले आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक लोकांनी आपले सर्वस्व बलिदान केले आहे, याची जाणीव झाली.

प्रत्येक मजल्यावर काही प्रसंग दृक-श्राव्य पद्धतीने दाखविण्यात आले आहेत. भिंतीवरही माहिती फलक लावलेले आहेत. सर्व पुतळे सिलिकॉनने केलेले असून त्यांची प्रमाणबद्धता, चेहऱ्यावरील भाव इतके सुंदर आहेत की, लांबून तरी ती जिवंत माणसेच वाटतात.

क्रांतिवीर चापेकर वाडा खूप छान ठेवला आहे आणि तेथील गाईडने सर्व इतिहास खूप चांगल्या पद्धतीने ओघवत्या भाषेत कथन केला. त्यामुळे सर्वजण भारावलेल्या मन:स्थितीतच बाहेर पडले. यानंतर सर्वानी अन्नपूर्णा रेस्टॉरंटमध्ये पोटपूजा करुन जवळच असलेल्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगाव बोटक्लबला भेट दिली. पवना नदीच्या काठावर हे निसर्गरम्य उद्यान वसविले आहे.

ठरविल्याप्रमाणे सर्व ठिकाणं पाहून आणि खूप साऱ्या आठवणी घेऊन आम्ही पुण्याकडे प्रस्थान ठेवले.

**सुनीता फुलंब्रीकर**